जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-06/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 15.06.2021

<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>

<u>सर्वसाधारण सभेची सूचना</u>

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनसूची ``ड`` चे प्रकरण-2 मधील नियम क्रं. 1 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची (ड) चे प्रकरण-2 मधील नियम क्रं 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महापौर, सौ. मोहीनी विजय येवनकर, यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दिनांक 23.06.2021 रोजी दुपारी 12.00 नावाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील डॉ. कै. शंकररावजी चव्हाण सभागृहात आयोजीत करण्यात अली आहे.

सदर सभेच्या कामकाजाची विषय पत्रिका तपशील खालील प्रमाणे आहे. करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

(मा. महापौर यांच्या मान्यतेने)

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

प्रति
श्री/श्रीमती ------------------------------
सदस्य /सदस्या,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

<u>आयुक्त यांच्याकडून प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>

विषय क्रं. 01

विषय :- <u>महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम 37(1) अंतर्गत</u> नांदेड शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेमधील मौ. असदुल्लाबाद स. नं. 25 सेक्टर ``सी`` मधील ईपी 8 नूसार आरक्षण क्रं. C-36 प्रायव्हेट बस पार्कींगचे आरक्षण पूर्णतः रद्द करून अस्तित्वातील वापराप्रमाणे करण्या बाबत.

नांदेड शहराच्या मंजूर सुधारित विकास योजना शासन निर्णय क्रं. टीपीएस-3206/488//सिआर-104(बी)/2006/युडी-30 दिनांक 03.08.2006 अन्वये मंजूर केली असून, त्यानुषंगाने यापूर्वी मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 247 दिनांक 30.11.2018 अन्वये मंजूर सुधारित विकास योजनेमधील मौ. असदुल्लाबाद स. नं. 25 सेक्टर ``सी`` मधील ईपी 8 नूसार आराक्षण क्रं. C-36 प्रायेव्हेट प्रायव्हेट बस पार्कींग वापरातुन सुमारे 276.88 चौ.मी. जागा (त्रिकोणी) कमी करुन नवीन आरक्षण हरित क्रांतीचे जनक श्री वसंतरावजी नाईक यांचा पुतळा उभरण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम कलम 37(1) अन्वये किरकोळ फेरबदल करणेची शिफारस करण्यात आली होती.

त्यानुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 104 दिनांक 26.10.2020 अन्वये नांदेड शहराच्या मंजूर सुधारीत विकास योजनेमधील मौ. असदुल्लाबाद स. नं. 25 सेक्टर ``सी`` मधील ईपी 8 नुसार आरक्षण क्रं. C-36 प्रायव्हेट बस पार्कींगचे आरक्षण पूर्णतः रद्द करून अस्तित्वातील वापराप्रमाणे करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करून प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्तावित फेर बदलाची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रमध्ये इंग्रजी व मराठी भाषेत पृष्ठ क्रं. 15, 16 वर दिनांक 04 ते 10 फेब्रुवारी 2021 रोजी प्रसिध्द झाली असुन स्थानिक वृतपत्र दै. एकमत मध्ये व दै.

Scanned with CamScanner

गोदातीर समाचार मध्ये दिनांक 22.01.2021 रोजी प्रसिध्द झालेली आहे. तसेच सदर प्रसिध्दीकरणानुसार प्रस्तावित आरक्षणाखालील बाधित मालमत्ताधारकास पत्र क्रं. नरवी/985 दिनांक 21.01.2021 अन्वये हरकती / सुचना / आक्षेपा बाबत कळविणेत आले होते. प्रसिध्दीकरणात नमूद केल्यानुसार सदर बदलाबाबत विहित मुदतीत आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

सबब सदर आरक्षण रद्द करुन त्याखालील क्षेत्र विकास योजनेत अस्तित्वातील वापराप्रमाणे दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदल प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

<u>स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना</u>

विषय क्रं. 02

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता 5वी ते 10वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना लागु करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक :- संगीता पाटील डक — अनुमोदक :- गितांजली हाटकर (कापुरे)

विषय क्रं. 03

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत विविध क्षेत्रातील विशेष तज्ञ व्यक्तीचे नांव अंतीम करुन मार्गदर्शन गटाची स्थापना करण्यास मान्यता देणे बाबत.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले — अनुमोदक :- आनंद चव्हाण

विषय क्रं. 04

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत हैदराबादच्या धर्तीवर लुकेंफे पध्दतीने अद्यावत शौचालय निर्माण करण्यास मान्यता देणे बाबत.

सुचक :- आनंद चव्हाण — अनुमोदक :- अ. सतार अ. गफुर

विषय क्रं. 05

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रायोगीक तत्वावर शहरात 04 ठिकाणी R.O. पिण्याचे शुध्द यंत्र बसवुन अल्पदरात पाणी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणे.

सुचक :- तेहरा अमितसिंह — अनुमोदक :- स. विरेंदसिंघ गाडीवाले

विषय क्रं. 06

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हैदरबाग व शिवाजीनगर दवाखान्यात महात्मा फुले आरोग्य योजना लागु होण्यासाठी योग्यती कार्यवाही करणे बाबत.

सुचक :- बापुराव गजभारे — अनुमोदक :- अ. शमीम अब्दुल्ला

विषय क्रं. 07

प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील जिवनगौरव पुरस्कार वितरण करण्यासाठी समिती गठीत करणे बाबत.

सुचक :- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले — अनुमोदक :- बापुराव गजभारे

विषय क्रं. 08

प्रस्ताव

नांदेड महानगरपालिका हद्यीत मौ. सांगवी बु. येथील गट क्रं. 171 मधील आसरानगर मुस्लीम कब्रस्तानच्या सुरक्षा भिंत बांधणे व दफनभुमीच्या जागेत शव स्नानगृह (गुसलखाना) बांधणे बाबत.

सुचक :- फारुख अली खान, मुन्तजीबोद्यीन मुनीरोद्यीन, स. शेर अली. — अनुमोदक :- शबाना बेगम मो. नासेर

(स. अजीतपालसिंघ संधु)
नगरसचिव
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

Scanned with CamScanner

दिनांक :- 16.06.2021

प्रति,

मा. श्री / सौ. ------------------------------

सदस्य / सदस्या,

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

विषय :- दिनांक 23.06.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेल्या मनपा सर्वसाधारण सभेत कोरोना व्हॅक्सीन घेवूनच उपस्थित राहणे बाबत

महोदय,

वरील विषयी विनंती की, मा. महापौर यांच्या आदेशान्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची दिनांक 23.06.2021 रोजी दुपारी 12.00 वाजता आयोजीत करण्यात आलेली <u>मनपाकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील डॉ. कै. शंकररावजी चव्हाण सभागृहात आयोजीत करण्यात आलेली असुन</u> सदरील सभेत सर्व स. सदस्य/ सर्व विभाग प्रमुख व अधिकारी यांनी कोरोना व्हॅक्सीनचा पहिला अथवा दुसरा डोस घेणे. ज्या सदस्यांनी / विभाग प्रमुखांनी कोणताही डोस घेतलेला नसेल तर त्यांनी सभेच्या एक दिवस अगोदर RTPCR ची चाचणी अहवाल (रिपोर्ट) घेवुन सभागृहात प्रवेश घेणे.

तसेच ज्या सदस्यांनी / विभाग प्रमुखांनी व्हॅक्सीन अथवा RTPCR चाचणी घेतलेली नाही त्यांनी ऑनलाईनव्दारे सदरील सभेत उपस्थित राहण्याचे आदेशीत केलेले आहे.

करिता सर्वांनी याची नोंद घ्यावी ही विनंती.

(मा. महापौर यांच्या आदेशान्वये)

नगरसचिव

( स. अजीतपालसिंघ संधू )

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

( सोबत उक्त सभेची विषय पत्रिका )